## निवडक

### वजरी सरकारी माध्यमिक विद्यालयाचे अभिनंदनीय यश

■ टीम दैनिक हेराल्ड


संस्कार नाईक


हर्षा शेट्ये

**पेडणे, दि. १६ :** राज्य मंडळ व शिक्षण प्रशिक्षण संशोधन केंद्रातर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय राष्ट्रीय साधना शिष्यवृत्ती परीक्षेत वजरी सरकारी माध्यमिक विद्यालयाचे दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले. संस्कार जीतेंद्र नाईक व हर्षा महादेव शेट्ये हे दोन विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले. या विद्यार्थ्यांना बारावीपर्यंत शिष्यवृत्ती प्राप्त होणार आहे. ही परीक्षा दरवर्षी आठवीतील हुशार विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येते. या परीक्षेत दोन विद्यार्थ्यांची निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ममता नाईक, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष दिनेश मयेकर तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शेफाली मयेकर, शिक्षक, पालक यांनी विशेष अभिनंदन केले.

---

### नावेली येथे आज फिजिओ थेरपी शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १६ :** गोवा कॉलेज ऑफ फिजिओथेरपी नॅचुरोपॅथी अँड योगिक सायन्स, सांखळी–गोवा यांच्यातर्फे श्री बेताळ देवस्थान सभागृह, दुरगवाडा, नावेली येथे शनिवार दि. १७ रोजी सकाळी ९ ते दुपारी १२.३० पर्यंत मोफत फिजिओथेरपी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नावेली परिसरातील नागरिकांनी तसेच इतर भागातील नागरिकांना विनंती करण्यात येते की त्यांनी या शिबिराचा अधिकाधिक लाभ घ्यावा.

---

### रघुनाथ बुवा खाडिलकर यांची आज पुण्यतिथी महोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. १६ :** श्री समर्थ रामदास सेवा भक्ती मंडळ समर्थमठ, कुचेली – कामुलीरोड, तीनमाड, सडये, शिवोली येथे प. पू. गुरुवर्य रघुनाथ बुवा खाडिलकर ३२वी पुण्यतिथी महोत्सव व कामधेनू भिक्षाफेरी पुण्यतिथी शनिवार दि. १७ रोजी प.पू. रघुनाथबुवा खाडिलकर पुण्यतिथी, मठांतप्रातः काळीभूपाळ्या, काकड आरत्या. सकाळी ८.३० वाजता महापूजा व गुरुवर्य समर्थ पादुकावरअभिषेक, पूजा. (यजमान: श्री. व सौ. सोनिया सदानंद गोवेकर) तसेच सौ. दीपाली व श्री. दिगंबर वायंगणकर यांच्या हस्ते समाधीवर अभिषेक, सकाळी९ ते १०.३० पर्यंत सामुदायिक उपासना त्यानंतर श्रीरामनाम गजर– श्याममांद्रेकर, श्रीदत्ताकांबळी, सुरेशकवठणकर, साथी– उद्धेश पेडणेकर, सकाळी ११ वाजता श्री सरोज सिमेपुरुषकरवश्री. जगनाथमांद्रेकर हे खाडिलकर बावांबद्दल मनोगत व्यक्त करतील. दुपारी १२ वाजता ह.भ.प. व्ही.जी. शेटगावकर यांचे कीर्तन. साथी – हार्मोनियम : उद्धेश पेडणेकर, तबला श्याम मांद्रेकर, जितेंद्र वायंगणकर दुपारी १ वाजता खाडिलकर बुवा यांच्या स्मरणार्थ समर्थ भक्तथी. वासुदेव कृष्णा चोडणकर यांचा शिवशंकर मयेकर यांच्या हस्ते सन्मान नंतर आरत्या व महाप्रसाद संध्याकाळी ७ वाजता नामस्मरण, सत्संगव भजन त्यानंतर उत्सवाची सांगता.

---

### मांद्रेत १८ रोजी पावसाचे पाणी संकलन, पुनर्भरण उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १६ :** मांद्रे व अन्य गावातील जमिनीत पाण्याची पातळी वाढविण्याचे काम आपण करू शकतो हे लक्ष्य ठरवून ,खास कार्यक्रम रविवार दि. १८ रोजी सकाळी १० वाजता श्री भगवती सप्तेश्वर मंदिर प्रांगणात आयोजन केल्याची माहिती अध्यक्ष कायसूवकर व संयोजक अँड शहापूरकर यांनी दिली.मांद्रे गावातील लहान–लहान ओढयांकडे दुर्लक्ष होत असून ,मोठ्या प्रमाणात बोअरवेलीमधून पाणी उपसले जात आहे.पावसाचे पाणी कुठेही न अडवल्यामुळे थेट समुद्राला जाऊन मिळत असल्याने जमिनीत पाणी खूप कमी प्रमाणात झिरपले जाते.जमिनीत पाण्याची पातळी खूप खाली गेली आहे,त्यामुळे गावात पाण्याची तीव्र टंचाई भासण्यास सुरुवात झालेली आहे. त्यावर उपाययोजना म्हणून सदर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.
पावसात जमिनिवर साठणारे पाणी, घराच्या छप्परावरून येणारे पाणी शास्त्रोक्त पद्धतीने जमिनीत शोषविले जाऊ शकते व पाण्याची पातळी वाढू शकते, याचे यशस्वी प्रयोग मांद्रे गावचे सुपुत्र व म्हाळसा मधलामाज येथील रहिवासी रुद्रेश उत्तम म्हामल यांनी करून दाखविले आहे.
गोव्यातील विविध भागातून त्यांनी केलेला प्रयोग जाणून घेण्यासाठी आमंत्रणे येत आहेत. अशा गावच्या सुपुत्राकडून गावातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी आपण काय करू शकतो या विषयावर विचार मांडण्यात येणार असून प्रत्यक्ष प्रात्याक्षिके करून दाखविणार आहे.
तेव्हा देवस्थान समितीचे पदाधिकारी, स्वयंसेवी मंडळाचे अधिकारी या नात्याने आपणास आमंत्रित करत असून कार्यक्रमास हजर रहावे असे आवाहन मांद्रे नववर्ष स्वागत समितीचे अध्यक्ष श्री मुकुंद कायसुकर व कार्यक्रम संयोजक अॅड. प्रसाद शहापुरकर यांनी केले आहे.

---

# आयपीएल २०२५ : ६ नवीन खेळाडूंची होणार एन्ट्री

## आरसीबीला मिळणार दिलासा | आजचा सामना विरुद्ध केकेआर

**मुंबई, दि. १६ :**

इंडियन प्रीमियर लीगच्या १८व्या हंगामात आतापर्यंत ५७ सामने खेळले गेले आहेत. (८ मे) रोजी भारत–पाकिस्तान तणावामुळे ही स्पर्धा एका आठवड्यासाठी रद्द करण्यात आली होती. त्यामुळे अनेक खेळाडू दुखापतींमुळे स्पर्धेतून बाहेर पडले आहेत आणि अनेक खेळाडू आंतरराष्ट्रीय स्पर्धांमुळे भारतात येत नाहीत. (८ मे) नंतर कोणत्या खेळाडूंनी बदली खेळाडू म्हणून आयपीएलमध्ये प्रवेश केला आहे ते जाणून घेऊया.

पंजाब किंग्ज त्यांचा जखमी खेळाडू लॉकी फर्ग्युसन, (१३ एप्रिल) रोजी हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर पडला होता, त्याच्या जागी न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज काइल जेमिसनची निवड करण्यात आली आहे. जेमिसनला आयपीएलच्या पंजाब संघात २ कोटी रुपयांना स्थान देण्यात आले.

आयपीएल स्पर्धेतून बाहेर पडलेल्या राजस्थान रॉयल्सने (८ मे) रोजी त्यांच्या २ जखमी खेळाडूंच्या बदलीची घोषणा केली. नितीश राणा हा पायाच्या दुखापतीमुळे आणि संदीप शर्माला बोटाच्या दुखापतीमुळे स्पर्धेतून बाहेर पडला आहे. नितीशच्या जागी संघाने दक्षिण आफ्रिकेच्या लुआन–ड्रे प्रिटोरियसला ३० लाख रुपयांना संधी दिली आहे. संदीपच्या जागी दक्षिण आफ्रिकेचा खेळाडू म्हणूनही निवड करण्यात आलीआहे.




आयपीएल स्थगित झाल्यानंतर दिल्ली कॅपिटल्सचा ऑस्ट्रेलियन फलंदाज जेक फ्रेझर –मॅकजॉर्ज घरी परतला. वैयक्तिक कारणांमुळे त्याने भारतात परत न येण्याचा निर्णय घेतला आणि (१४ मे) रोजी दिल्ली कॅपिटल्सने मुस्तफिजूर रहमानला ६ कोटी रुपयांना त्याच्या जागी घेतले.

गुजरात टायटन्सने त्यांचा स्फोटक फलंदाज जोस बटलरच्या जागी खेळण्याची घोषणा केली आहे. राष्ट्रीय कर्तव्यामुळे बटलर उर्वरित सामने खेळणार नाही, त्याची जागा श्रीलंकेच्या कुसल मेंडिसने ७५ लाख रुपयांना घेतली आहे.

लखनौ सुपर जायंट्सचा वेगवान गोलंदाज मयंक यादव सुरुवातीला दुखापतग्रस्त होता, परंतु आयपीएल स्थगित झाल्यानंतर नवीन वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर संघाने त्याच्या जागी खेळाडूची घोषणा केली. (१५ मे) रोजी मयंकच्या जागी न्यूझीलंडचा गोलंदाज 'विल ओ'रोर्कला ३ कोटी रुपयांना लखनौ संघात सामील करण्यात आले.

(३ मे) रोजी सीएसके विरुद्ध आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारला बोटाला दुखापत झाली होती, त्यानंतर असे म्हटले जात होते की तो लीग स्टेज सामन्यांमधून बाहेर पडू शकतो. आरसीबीचा पुढचा सामना (८ मे) रोजी लखनौ विरुद्ध होता, ज्यामध्ये पाटीदार यांच्यावर शंका होती. तथापि, या सामन्यापूर्वीच स्पर्धा स्थगित करण्यात आली होती आणि नवीन वेळापत्रकानुसार, आरसीबीचा पुढचा सामना (१७ मे) रोजी केकेआर विरुद्ध आहे. रजत त्याच्या संघात सामील झाला आहे, त्यालाही वेळ मिळाला आहे. तो बेंगळुरूमध्ये कोलकाता सामन्यांचे नेतृत्व करताना दिसण्याची शक्यता आहे.

---

## सॅफ फुटबॉल चॅम्पियनशिपमध्ये भारताने नेपाळला हरवले

**युपीया, दि. १६ :**

भारताने येथे सुरू असलेल्या यू–१९ सॅफ फुटबॉल चॅम्पियनशिपमध्ये नेपाळचा पराभव करून गट ब मधील अग्रस्थान निश्चित केले. भारताने ही लढत ४–० अशी जिंकली.

रोहेन सिंग छापामयुमने (२८ व ७६) दोन तर स्थानिक खेळाडू ओमंग डोडमने (२९) व डॅनी मैतेई (८४) यांनी एकेक गोल नोंदवला. भारताने दोन्ही सामने जिंकून ६ गुणांसह गटात अग्रस्थान मिळविले. भारताचा गोलांचा फरकही १२ गोलांचा आहे. नेपाळने दोन सामन्यातून ३ गुण घेत गटात दुसरे स्थान मिळविले. शुक्रवारी दि. १५ रोजी भारताची उपांत्य लढत गट अ मधील दुसऱ्या स्थानावरील संघ मालदिवशी होईल, तर दुसरा उपांत्य सामना बांगलादेश व नेपाळ यांच्यात होईल.



दोन्ही संघांनी उपांत्य फेरी याआधीच निश्चित केली होती. त्यामुळे गटात अग्रस्थान कोण मिळविणार याबाबत या सामन्यात उत्सुकता होती. दोन्ही संघ अग्रस्थान पटकावण्यासाठी कोणतीही तडजोड करण्यास तयार नसल्याचे सामन्यात दिसून आले. मात्र गोल करण्यास सुरुवात झाल्यानंतर भारताने स्वत:चे वर्चस्व सिद्ध केले. मलेम्नगाम्बा सिंगने डाव्या पायाने मारलेला चेंडू काही जणांनी हेडिंग केल्यानंतर डाव्या बगलेतून रोहेनकडे क्रॉस पास आला. त्याने लगेचच चेंडू स्लाईड करीत नेपाळ गोलरक्षक भक्त बहादुर पेरियारला हुलकावणी देत २८ व्या मिनिटाला गोल नोंदवला. एका मिनिटानंतर ही आघाडी २–० अशी केली. त्याने डॅनीकडून मिळालेल्या पासवर साईडफूटने टॉप कॉर्नरवर फटका मारत हा गोल केला.

दोन गोलांच्या आघाडीमुळे भारताचा आत्मविश्वास दुणावल्याने त्यांनी आणखी वर्चस्व गाजविले. उत्तरार्धात ओमंग, डॅनी व प्रशान या त्रिकुटाने नेपाळच्या बचावफळीची परीक्षाच घेतली. सामना संपण्यास १४ मिनिटे बाकी असताना भारताने त्यात तिसऱ्या गोलाची भर घातली. प्रशान जाजोने डॅनीला लो कट बॅकपास पुरविला, त्याने पेनल्टी स्पॉटजवळून जोरदार फटका लगावला. पण पेरियारने तो वाचवला. पण रिबाऊंड झालेल्या चेंडूवर ताबा घेत रोहेनने वैयक्तिक दुसरा व संघाचा तिसरा गोल नोंदवला. सामन्यात प्रभावी प्रदर्शन केलेल्या डॅनीला सामना संपण्यास सहा मिनिटे असताना संधी मिळाली. कर्णधार सिंगामयुम शमीचा लांबवरून मारलेला फटका पेरियारने थोपविल्यानंतर रिबाऊंड झालेला चेंडू डॅनीने अचूक गोलपोस्टमध्ये ढकलला. डॅनीने लंकेविरुद्धच्या सामन्यात हॅटट्रिक नोंदवली होती.

---

## रोहित–कोहलीच्या निवृत्तीमुळे घाबरण्याची गरज नाही : मांजरेकर

**मुंबई, दि. १६ :**

माजी भारतीय क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या सलग निवृत्तीनंतर घाबरून जाण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले आहे. मांजरेकर यांच्या मते, सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, व्हीव्हीएस लक्ष्मण आणि सौरव गांगुली या फॅब फोर'च्या निवृत्तीनंतरही भारतीय संघाने मोठे यश मिळवले आहे आणि भविष्यातही संघ उंचीवर राहील.

मांजरेकर यांनी त्यांच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये म्हटले आहे की, जेव्हा या चार महान खेळाडूंनी एकाच वेळी निवृत्ती घेतली तेव्हा अनेक चाहत्यांमध्ये भीती पसरली होती. मात्र काही वर्षांनंतर भारत जगातील नंबर वन कसोटी संघ बनला होता. त्यांनी पुढे सांगितले, जोपर्यंत भारतात क्रिकेटची लोकप्रियता टिकून आहे आणि तरुण खेळाडू देशासाठी खेळण्यास उत्सुक आहेत, तोपर्यंत कोणत्याही अडचणीवर मात होईल. नव्या प्रतिभांचा उदय होईल आणि संघ पुन्हा उंचीवर जाईल.

माजी फलंदाजांनी लक्ष्मण, गांगुली, द्रविड आणि तेंडुलकर यांच्या निवृत्तीनंतर भारतीय गोलंदाजी आक्रमण अधिक सामर्थ्यवान झाल्याचेही नमूद केले. फॅब फोरच्या निवृत्तीनंतर थोडा काळ लागला, पण भारताने गोलंदाजीचा दर्जा सुधारला. यावेळीही तसेच घडेल. नवीन स्टार्स आणि गोलंदाज दिसून येतील आणि भारत जगातील टॉप संघांपैकी एक राहील.मांजरेकर यांनी परदेशातील फलंदाजीच्या आव्हानांवरही प्रकाश टाकला. त्यांनी रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासह भारतीय संघाने नुकत्याच न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर ३–० असा पराभव पत्करल्याचे आणि ऑस्ट्रेलियातही पराभव झाला असल्याचे स्मरण करून दिले.

---

## राज्यस्तरीय अॅथलेटिक्स स्पर्धेत भूमिका विद्यालयाच्या मुलींचा संघ विजेता

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १६ :** गोवा क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय थलेटिक्स स्पर्धेत पर्ये–सत्तरी येथील श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाने मुलांच्या गटाबरोबरच मुलींच्या गटाने विजेतेपद प्राप्त केले.

राणी डेगवेकर हिने १०० मीटर धावणे,२०० मीटर धावणे व लांब उडीमध्ये सुवर्ण पदके व कु.एंजल लोपेस हिने १०० मीटर अडथळा शर्यत, ४०० मीटर अडथळा शर्यत, ४०० मीटर धावणेमध्ये सुवर्ण पदके जिंकून उत्कृष्ट खेळाडूंचा मान पटकाविला.

क्षितिजा गावस हिला तिहेरी उडीमध्ये सुवर्णपदक, साईशा गावस हिला तिहेरी उडीमध्ये रौप्य पदक, मुलींच्या रिले संघात ४ – १०० मीटर आणि ४ –४०० मीटर रिलेमध्ये दोन रौप्य पदके यात क्षितिजा गावस, एंजल लोपेस, शिरीन वर्गीस, राणी डेगवेकर यांचा सहभाग होता.

दीतीका गावकर तीन किलोमीटर चालणे, जान्हवी सावंत गोळा फेक, सिया जाधव उंच उडीमध्ये या सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली.


**साखळी : राज्यस्तरीय अॅथलेटिक्स स्पर्धेचे विजेतेपद पटकावलेल्या मुलींच्या संघाचा गौरव करताना प्राचार्य यशवंत सावंत. सोबत उपप्राचार्य रावसाहेब राणे व इतर शिक्षकवर्ग.**

या सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षक अमोल वझे यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य यशवंत सावंत,उपप्राचार्य श्री रावसाहेब राणे, श्री भूमिका शिक्षण संस्था, श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक या सगळ्यांच्या वतीने शारीरिक शिक्षण शिक्षक अमोल वझे व सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या सर्व विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षक अमोल वझे यांचे मार्गदर्शन लाभले.प्राचार्य यशवंत सावंत,उपप्राचार्य श्री रावसाहेब राणे, श्री भूमिका शिक्षण संस्था, श्री भूमिका उच्च माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक या सगळ्यांच्या वतीने शारीरिक शिक्षण शिक्षक अमोल वझे व सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

---

## 'तो सामान्य खेळाडू म्हणून खेळू इच्छित नव्हता'

### विराट कोहलीच्या निवृत्तीबाबत नासीर हुसेन यांची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली, दि. १६ :**

विराट कोहलीला एक सामान्य क्रिकेटपटू होण्याची इच्छा नव्हती. तो शेवटपर्यंत जिंकण्याच्या भूमिकेत राहिला. त्याच्यासाठी क्रिकेट म्हणजे फक्त खेळ नव्हे, तर विजय मिळवण्याची एक ध्यास होता, अशी प्रतिक्रीया इंग्लंडचे माजी कर्णधार नासीर हुसेन यांनी दिली आहे.कोहलीने घेतलेला हा निर्णय अनेकांसाठी धक्कादायक ठरला असून, इंग्लंडविरुद्धची पाच सामन्यांची कसोटी मालिका त्याची पुढील संभाव्य मोहीम ठरली असती असे ते म्हणाले.

नासीर हुसेन यांनी स्काय स्पोर्ट्स क्रिकेट पॉडकास्टमध्ये बोलताना सांगितले की, कोहली हा खेळाच्या प्रत्येक पैलूला शंभर टक्के देणारा खेळाडू होता. तुम्ही त्याचे खेळपट्टीवरचे वागणे पाहिले तर त्यात कधीही सौम्यपणा जाणवला नाही. त्याचे धावांचा पाठलाग करतानाचे कौशल्य हे त्याच्या जिंकण्याच्या वृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. त्याने भारताला एका नव्या उंचीवर नेले.




कोहली हा भारताचा सांख्यिकदृष्ट्या सर्वश्रेष्ठ कसोटी कर्णधार मानला जातो. त्याने कर्णधार म्हणून ६८ कसोटी सामन्यांमध्ये ४० विजय मिळवले असून त्याचा विजयाचा टक्का ५८.८ इतका आहे. त्याने भारताला जगात अव्वल क्रमांकावर नेले आणि जवळपास ४२ महिने तो तिथे कायम राहिला. त्याने संघाची मानसिकता आणि खेळाची शैलीच बदलून टाकली असंही हुसेन यांनी नमूद केले.

कोहलीने सचिन तेंडुलकरकडून भारतासाठी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची जबाबदारी स्वीकारली होती. त्याच्या निवृत्तीनंतर या क्रमांकावर कोण खेळणार याबाबतही चर्चेला उधाण आले आहे. हुसेन यांचे सहकारी म्हणाले की, कोहलीनंतर चौथ्या क्रमांकाची जागा कोण घेणार हे स्पष्ट नाही. सचिननंतर कोहली आणि आता कोण? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

इंग्लंडचेच आणखी एक माजी कर्णधार मायकेल आथर्टन यांनी कोहलीबद्दल बोलताना सांगितले की, कोहलीवरून नजर हटवणे अशक्य होते. त्याच्यात एक आकर्षण होते. त्याची ऊर्जा, त्याचा आभा आणि त्याची खेळाबद्दलची प्रचंड आवड ही प्रेक्षकांना खिळवून ठेवायची.

कोहलीने आपल्या निवृत्तीच्या निवेदनात कसोटी क्रिकेटच्या आव्हानांचा उल्लेख केला होता, याकडे लक्ष वेधत आथर्टन म्हणाले, त्याने खेळलेल्या प्रत्येक दिवशी त्याचे एक वेगळेच योगदान असायचे. १२३ कसोटी सामन्यांमध्ये त्याने मन आणि आत्मा ओतून खेळ केला. त्याची ती ऊर्जा आणि ती तळमळ कधीच कमी झाली नाही.

---

## केकेआर प्लेऑफच्या रेसमधून बाहेर होणार ?

**मुंबई, दि. १६ :**

पॉईंट्स टेबलवर आरसीबी दुसऱ्या तर केकेआर सहाव्या स्थानावर आहे. आरसीबी केकेआरचा पराभव करून प्लेऑफमध्ये जाण्याचा प्रयत्न करेल, तसेच केकेआर सामना जिंकून प्लेऑफच्या रेसमध्ये टिकण्याचा प्रयत्न करेल. पण केकेआर संघावर प्लेऑफ मधून बाहेर पडण्याचे सावट आहे.

या सामन्यावर पावसाचे सावट आहे. गुरुवार (१५ मे) रोजी बंगळूरुमध्ये खूप पाऊस झाला आहे. तसेच हवामान खात्याच्या रिपोर्टनुसार सामन्यादिवशी सुद्धा बंगळूरुत पाऊस पडण्याची शक्यता आहे. जर पावसामुळे सामना रद्द झाला तर, दोन्ही संघांना एक–एक पॉईंट्स मिळेल. त्याचप्रमाणे जर १ पॉईंट मिळाला तर आरसीबी प्लेऑफसाठी पात्र होईल. तसेच केकेआर प्लेऑफच्या रेस मधून बाहेर पडेल. त्यामुळे एका गुणाने केकेआरच्या अडचणी थांबणार नाहीत. जर प्लेऑफच्या रेसमध्ये टिकून राहायचे असेल, तर केकेआरला सामना जिंकून दोन पॉईंट्स मिळवावेच लागतील.




कोलकाताने आतापर्यंत १२ सामने खेळले आहेत. ज्यामध्ये ५ सामन्यात त्यांना विजय मिळाला आहे. तसेच ६ सामन्यात त्यांनी पराभव पत्करला आहे. त्यांचा एक सामना रद्द झाला होता, त्यामुळे सध्या त्यांचे १३ गुण आहेत.

भारत– पाकिस्तान संघर्षामुळे बीसीसीआयने आयपीएल २०२५ स्पर्धा एका आठवड्यासाठी स्थगित केली होती. त्यानंतर आता १७ मे पासून स्पर्धा पुन्हा सुरू होत आहे. स्पर्धा स्थगित झाल्यामुळे अंतिम सामन्याची तारीख देखील बदलली आहे. आता अंतिम सामना २५ मे रोजी नाही तर ३ जून रोजी खेळला जाणार आहे. प्लेऑफची सुरुवात २९ मे पासून होणार आहे. त्याच्या ठिकाणांची घोषणा अजूनही करण्यात आली नाही.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २५४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 254 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .